
सायं.दैनिक
बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

## सीबीएसई बोर्ड परीक्षेत नाथ व्हॅली स्कूलचा राजवीर युधाजित पंडित ९५ % गुणाने उत्तीर्ण



गेवराई (किसान न्युज): नुकत्याच झालेल्या सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला असून छत्रपती संभाजीनगर येथील नाथ व्हॅली स्कूल मधून राणा राजवीर युधाजित पंडित हा ९५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाला आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्याचे अभिनंदन करून कौतुक केले. छत्रपती संभाजीनगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या राणा राजवीर पंडित याने तीन विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण घेऊन सीबीएसई बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुणाने उत्तीर्ण होत आपल्या कुशाग्र बुद्धीचे चुणूक दाखवली आहे. राणा राजवीर पंडित हे बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित आणि शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या सचिव सौ अनुरुपाताई पंडित यांचे चिरंजीव तर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सौ गिरीका भाभी पंडित यांचे नातू आणि युवानेते यशराज पंडित यांचे पुतणे आहेत. सीबीएसई बोर्ड » पान २ वर

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३५ ▪ गुरुवार, दि. १६ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १७ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-335 ▪ Thursday 16 April, 2026 ▪ Postal Date 17 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# माजलगाव च्या भर चौकात एसडीएम ,तहसीलदारांची नार्को टेस्ट करा; हप्ते खायचे यांनी अन् वरून दट्टा बसला की दंडाची कारवाई करायची हायवा मालकांवर

बीड । किसान न्युज

माजलगाव तालुक्यातील काही वाळू घाटांवर एका पावतीवर (ई-टीपी) अनेक ट्रिप मारण्याचा प्रकार घडला आहे. याबाबत महसूल मंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांना फोन करताच याबाबत जिल्हाधिकारी यांनी माजलगावचे एसडीएम यांना याची चौकशी करुन कारवाईचे आदेश दिले. वरुन दट्टा आल्याने नाविलाज झायाने आता वाळू वाहतूक करणाऱ्या हायवांचे लोकेशन तपासून कारवाई करण्याच्या हलचाली सुरू झाल्या आहेत. यामध्ये प्रशासन हायवांची यादी तयार करुन दंडात्मक कारवाई करण्याच्या विचारात दिसत आहे. मात्र वाळूमध्ये कंत्राटदार, महसूलचे व पोलीस दलाचे अधिकारी, कर्मचारी यांनी हात काळे केले आहेत. हप्ते घेऊन मजा मारली पण दंडात्मक कारवाई मात्र केवळ वाहतूक दारांवर हा कुठला नियम आहे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे या वाळू घोटाळा प्रकरणी पूर्ण चौकशी करुन प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी व वाळू घाट कंत्राटदार यांच्यावर ही कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## माजलगाव वाळू घोटाळा प्रकरणी महसूल मंत्र्यांचा दट्टा अन् जिल्हाधिकाऱ्यांचे कारवाईचे आदेश

## एका पावतीवर अनेक ट्रीप मारणाऱ्या हायवांवर प्रशासनाकडून दंडात्मक कारवाईच्या हलचाली सुरू



माजलगाव तालुक्यात अधिकृत अनेक वाळू घाट सुरू आहेत. मात्र यातील सावरगाव आणि गंगामसला या दोन वाळू घाटावर अनेक गैरप्रकार घडले असून, पोकलेन, जेसीबी, केणी च्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करण्यात आला. पावत्या कमी ब्रासच्या फाडून जास्त वाळू भरुन देण्यात आली. तसेच एका पावतीवर अनेक ट्रिप मारल्या आहेत. तसेच सोलापूर,पुणे, जालना अशा बाहेर जिल्ह्यातील अनेक पावत्या फाडून वाळू मात्र दुसरीकडेच टाकण्यात आली आहे. यासाठी हायवा वाहतूकदारांकडून महसूल आणि पोलीस अधिकाऱ्यांनी हप्तेखोरी करीत स्वतःचे उखळ पांढरे करुन घेतले आहेत. मात्र ही तक्रार सरळ महसूल मंत्र्यांपर्यंत गेली आहे. याची गंभीर दखल घेत त्यांनी जिल्हाधिकारी यांना याबाबत चौकशीचे आदेश दिले आहेत. यानंतर जिल्हाधिकारी यांनी माजलगावचे एसडीएम यांना कारवाईचे आदेश दिले आहेत. या आदेशानंतर एसडीएम यांनी काही वाळू घाट बंद केले आहेत. याची व्यापती वाढवून आता वाहतूक करणाऱ्या हायवांचे जीपीएस प्रणालीच्या आधारे ट्रॅक करुन ई-टीपी नंबर आणि दिलेले ठिकाण आणि वाळू टाकण्यात आलेले ठिकाण तपासले जात आहेत. यामध्ये शेकडो हायवा हे वेगळ्याच ठिकाणी वाळू टाकत असल्याचे दिसून येत आहेत. यामुळे याची पूर्ण चौकशी करुन यानंतर या हायवा धारकांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या हलचाली सुरू आहेत. मात्र मजा तर सर्वांनीच मारली असताना हायवा धारकांना बळीचा बकरा बनवून त्यांच्या नावावर पावती फाडली जाणार असे दिसून येत आहे. मग हप्ते खाणारे अधिकारी कर्मचारी » पान २ वर

### दोनच वाळू घाट चर्चेत

माजलगाव तालुक्यात अनेक वाळू घाट सुरू आहेत. पण सध्या चौकशीच्या फेऱ्यात गंगामसला आणि हिवरा हे दोन वाळू घाट असल्याची चर्चा आहे. यामुळे इतर वाळू घाटांवर खर्च सर्व काही नियमाने सुरु आहे का? याची ही चौकशी होणे आवश्यक आहे. प्रशासनाचा दरा कायम ठेवायचा असेल तर चुकीला माफी नाही या तत्वावर काम करुन दोषी असणाऱ्या सर्वांवरच कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# एसपी साहेब,पेठ बीड पोलिसांना गाडीत घुसून मारण्याचा अधिकार दिला का?

## गांधीनगर मध्ये हायवा चालकाला गाडीत घुसून तोंड फूटूस्तर पेठ बीड पोलिसांनी केली मारहाण


बीड । किसान न्युज

रिकामा हायवा थांबवून पेठ बीड पोलिसांनी चालकाला तोंडातून रक्त येईपर्यंत मारहाण केली. याचे नेमकं कारण काय हे समोर आले नसून, मात्र रस्त्यात अडवून मारहाण करणं कोणत्या कायदात बसते की, अंगावर खाकी आहे म्हणून पोलिसांनी गुंडगिरी सुरू केली का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यामुळे बीडमध्ये पोलीसवाला गुंडा अशी चर्चा सुरू झाली आहे. कोणाला धडक देऊन पळणारा किंवा त्यात वाळू, मुरुम असेल तर चौकशी थांबवणं आणि नाही थांबलं तर त्यावर कायदेशीर कारवाई करणे हे समजु शकते. पण आज दुपारी गांधीनगर येथे हायवा थांबवून पेठ बीड पोलीस ठाण्याचा कर्मचारी कॅबिनमध्ये चढून चालकाला मारहाण केली. तेही तोंड फुटेपर्यंत मारले असून, तोंडातून रक्त वाहू लागलं तरी या गुंड पोलिसाचा पारा आणि हात काही थांबला नाही. » पान २ वर

### पोलीस अधीक्षक यांचे प्रतिमा सुधारण्याच्या प्रयत्नांना हरताळ



एकीकडे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे जनसामान्यांमध्ये पोलीस दलाची प्रतिमा सुधारण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यात त्यांना बरेच यश आल्याचे दिसून येत असून, सामान्य माणसांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. पण असे काही पोलीस कर्मचारी आहेत ते खोटेनाटे काही ही कुंभाड रचून मारण्या पर्यंत मजल गेली आहे. यामुळे एकप्रकारे हे पोलीस कर्मचारी पोलीस अधीक्षक यांच्या प्रयत्नांना हरताळ फासत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.







# डॉ.आंबेडकर जयंतीदिनी नालीचे पाणी रस्त्यावर निषेधार्थ आंदोलन

## फडसेंना कॉंक्रिटीकरण पुर्व तयारी का करता आली नाही




### सिओ साहेब तुम्ही चुकलातच



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ही काही अचानक आलेली नाही. याची तारीख निश्चित असते, बीड शहरात कोणत्या रस्त्यावर खड्डे आहेत याची माहिती आहे. तरीही याची अगोदर पासून तयारी करणं आवश्यक होते. तसेच नेमकं डांबर टाकून खड्डे बुजवायचे आहेत की, सिमेंट कॉंक्रेटने बुजायची हे ठरवलं पाहिजे. पण तसं न करता जयंतीच्या दोन दिवस आधी केवळ कच खडी टाकून खड्डे बुजविण्याचा अनोखा प्रकार घडला आहे. याला सर्वस्व सीओ फडसे आणि त्यांचे अभियंते आणि कर्मचारी जबाबदार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

बीड । किसान न्युज

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीदिनी नगरपालिका समोरच जयंती मार्गावर रस्त्यात नालीच्या पाण्याचे तळे साचले होते. यामुळे भीम सैनिकांमध्ये असंतोष पसरला होता. या घटनेच्या निषेधार्थ नगरपालिका समोरील आंबेडकरवादी अनुयायांनी आंदोलन सुरू केले. त्यांनी शहरात स्वच्छता मोहीम राबविण्याची तसेच जयंती दिनी रस्त्यावर पाणी आले त्यात दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करीत जर आंदोलनाची दखल घेऊन मागण्या मान्य केल्या नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. शहरात मंगळवारी (दि.१४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मात्र या जयंतीदिनी नगरपालिका कारभार चव्हाट्यावर आला. जयंती मार्गावर चक्क खडी टाकून खड्डे बुजविण्याचा प्रकार झाला आहे. यावर ही मोठी चर्चा झाली तसेच हे » पान २ वर

### नगराध्यक्षांचे चौकशीचे आदेश



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव मिरवणूकीदरम्यान झालेल्या गैरसोयी प्रकरणी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. बुधवारी (दि.१५) दुपारी नगर पालिकेत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून स्वच्छता विभागातील गणेश पगारे, पाणी पुरवठ्याचे माने आणि बांधकाम विभागातील इंजि.किरण देशमुख यांना नोटीस बजावण्यात आली आहे. या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सांगितले.

### अधिकाऱ्यांना निलंबित करा : पप्पू कागदे



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अशी मागणी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देऊन केली.

## मुस्लिम आरक्षण मोर्चास सहभागी व्हा : आमेर



बीड । किसान न्युज

मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सय्यद आमेर यांनी केले आहे. ते म्हणाले की, मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे समाजावर अन्याय झाला असून, हा अन्याय दूर करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने रस्त्यावर उतरले पाहिजे. १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर होणारा हा मोर्चा ऐतिहासिक ठरणार असून, यात युवक, कामगार, विद्यार्थी आणि सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 153,000
२२ कॅरेट 147,000
चांदी प्रतिकिलो 252,000

## खाकीतील माणूसकी



बीड : शहर बसस्थानक परिसरात ड्युटी बजावत असताना वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार बाळासाहेब नागरगोजे यांनी एका वृद्ध व्यक्तीस मदतीचा हात देत मानवतेचे दर्शन घडविले.

# विधानपरिषदेच्या ९ जागांचे बिगुल वाजले

## १२ मे रोजी मतदान अन् निकाल होणार जाहीर



मुंबई । किसान न्युज

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या आणखी ९ जागांसाठी निवडणुकीची घोषणा झाली असून, राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचालींना वेग आला आहे. निवडणूक आयोगाने हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी १२ मे रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. मतदानाची वेळ सकाळी ९ ते दुपारी ४ अशी निश्चित करण्यात आली आहे. यामुळे अनेकांनी लॉबिंग सुरू केले आहे. या ९ जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार असल्यामुळे ही निवडणूक आवश्यक ठरली आहे. सध्या राज्यात बारामती आणि राहुरी येथे पोटनिवडणुका देखील होत आहेत, त्यामुळे एकूणच राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विधानसभेतील विद्यमान संख्याबळ लक्षात घेता, या ९ जागांपैकी भाजपला सुमारे ५ जागा मिळण्याची शक्यता आहे. शिवसेनेला २, राष्ट्रवादी » पान २ वर

### या ९ आमदारांचा कार्यकाळ संपतोय

ज्या ९ सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड, प्रवीण दटके आणि रमेश कराड यांचा समावेश आहे.

# खरीप हंगाम नियोजनासाठी प्रशासन सज्ज व्हावे; बियाणे अन् खतांचा काळाबाजार रोखा

## केज, अंबाजोगाई आढावा बैठकीत आ. नमिता मुंदडा यांचे निर्देश



केज/अंबाजोगाई । किसान न्युज

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची कोणतीही अडवणूक होऊ नये आणि त्यांना आवश्यक सोयीसुविधा वेळेत मिळाव्यात, यासाठी प्रशासन स्तरावर जय्यत तयारी करण्याचे निर्देश आमदार नमिता मुंदडा यांनी दिले आहेत. केज व अंबाजोगाई येथे आयोजित तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. भारतीय हवामान विभागाने २०२६ सालासाठी सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवल्याने, या बैठकीत नियोजनावर विशेष भर देण्यात आला. याप्रसंगी केज येथे महाडीबीटी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व इतर कृषी साहित्याचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार मुंदडा यांनी स्पष्ट केले की, कमी पावसाच्या शक्यतेमुळे हवामान विभाग आणि जागतिक हवामान संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पेरणीचे नियोजन करण्याबाबत गावोगावी प्रभावी जनजागृती करणे आवश्यक आहे. खरीप हंगामात दर्जेदार बियाणे आणि खतांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील याची खात्री प्रशासनाने करावी. बियाण्यांचा काळाबाजार, अनधिकृत साठा किंवा खतांच्या » पान २ वर